| MHNS240000982025 | **म.स.कौ.हिं. का. अर्ज क्र.०२/२०२५ नि.क्र.०१ वरील आदेश** |
|---|---|
| | भाविका रोशन सोनवणे<br>**वि.**<br>रोशन अरुण सोनवणे व इतर |

प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार व सा.वाला यांनी सदर प्रकरणामध्ये तडजोड होणार असल्याची शक्यता असल्याने प्रकरण मध्यस्थी करीता पाठविण्याची विनंती केली. त्यानुसार सदर प्रकरण श्री. मधुसुदन दिनकर महाडीक, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा यांच्याकडे मध्यस्थीकरीता पाठविण्यात आले. सदर प्रकरणामध्ये मध्यस्थ श्री. मधुसुदन महाडीक, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा यांनी नि.क्र.२१ कडे अहवाल पाठवुन पुरसीस नि.क्र.१८ प्रमाणे तडजोड झाल्याचे कळविले. सदर पुरसीस नि.क्र.१८ वाचून नोंदविण्यात आलेली आहे. त्यामधील कथन पाहता अर्जदार व सा.वाला यांनी हिंदु विवाह कायदा कलम १३–ब अंतर्गत अर्ज दाखल केला असल्याने त्यांना सदर प्रकरण चालविण्याचे नाही. सदर तडजोड ही कोणत्याही कायद्याच्या विरोधात नाही त्यामुळे ती नाकारण्याचा प्रश्न उद्भवत नाही. उभयपक्षकारांचे विधिज्ञ त्यांचे सोबत उपस्थित आहेत व ते त्यांचे पक्षकारांची ओळख पटवितात. खुद्द अर्जदार समक्ष हजर राहून तडजोड झाली असल्याने सदर अर्ज काढून घेत असल्यामुळे अर्जदाराची विनंती नाकारण्याची मुळीच प्रश्न उपस्थित होत नाही. त्यामुळे पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**०१.** अर्जदार व सा.वाला यांच्यामध्ये पुरसीस नि.क्र.१८ नुसार तडजोड झाल्याने सदर प्रकरण निकाली काढण्यात येतो.

**०२.** मध्यस्थी अहवाल नि.क्र.२१, नि.क्र.१८ वरील पुरसीस नि.क्र.१ सोबत ठेवण्यात यावी.

SHIPKULE CHARUDATTA

Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2026.06.09 15:22:49 +0530

**ठिकाण – सटाणा**
**दि. ०९/०६/२०२६.**

**(चारूदत्त उद्धव शिपकुले )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सटाणा.**